BACHELOR OF ARTS (B.A.) (PART - I) (CBCS PATTERN) SECOND SEMESTER CBCS

**BA12A2-1 - COMPULSORY MARATHI (आवश्यक मराठी)**

P. Pages : 2 **GUG/W/18/10025**

Time : Three Hours Max. Marks : 80

---

**1.** शिक्षण व शहरी संस्कृतीच्या बेगडी संस्कारांनी आप्तबांधवापासून दुरावलेल्या प्रकाशचे व्यक्तिचित्र योगिराज वाघमारे यांनी कसे रेखाटले आहे? **16**

**किंवा**

''कार्पोरेट मार्केटिंगच्या जाळ्यामध्ये आज सगळा भारतीय समाज फसलेला आहे'' हे भानू काळे यांचे विधान' बाजारू संस्कृतीच्या विळख्यात' या पाठाच्या आधारे सविस्तर स्पष्ट करा.

**2.** 'का हो माजविता दुही' या कवितेचे रसग्रहण करा. **16**

**किंवा**

वसुंधरेचा जन्मसोहळा कधी साजरा होईल, असे सुधाकर गायधनी सांगतात?

**3.** पुढीलपैकी **कोणत्याही एकाच** गटातील प्रश्नांची उत्तरे सुमारे शंभर शब्दांत लिहा. **16**

**गट 'अ'**

क) 'विद्यार्थ्यांच्या शिक्षणास अगदी अपरिहार्य असेल तेवढेच गुरुमुखाचे सहाय्य व्हावे', असे गो. ग . आगरकर का म्हणतात.

ख) 'तीर्थात देव नाही. पैशाचा नाश आहे', हे गाडगेबाबा कसे पटवून देतात?

ग) जागतिकीकरणामुळे मराठी भाषा व साहित्याच्या अस्तित्वाचे कोणते प्रश्न निर्माण झाले आहेत?

घ) कोणते शल्य ज्योतीला आयुष्यभर सोबत करणार, असे ऊर्मिला पवार सांगतात?

**किंवा**

**गट 'ब'**

च) 'कुमित्रांप्रमाणे दूष्य पुस्तकांचा सहवास टाळला पाहिजे,' असे गो. ग. आगरकर का म्हणतात?

छ) गाडगेबाबा आपल्या कीर्तनातून विद्येचे महत्त्व कसे विशद करतात?

ज) 'चंगळवाद' म्हणजे काय ते सांगून जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे तो कसा बळावत आहे, ते थोडक्यात स्पष्ट करा.

झ) मुलांची अदलाबदल करण्याची पाळी ज्योतीवर का आली?

munotes.in

4. पुढीलपैकी **कोणत्याही एकाच** गटातील प्रश्नांची उत्तरे सुमारे शंभर शब्दात लिहा. 16

**गट 'क'**

त) 'तोंडे झाले संन्यासु' या अभंगातून संत ज्ञानेश्वर दांभिकतेवर कसा प्रहार करतात?

थ) 'हे बंध रेशमाचे' या कवितेतून शांता शेळके माणसाच्या माणूसकीला कोणते आवाहन करतात?

द) 'काया म्हसीवानी रात नित् आमच्या दारात', असे कवी विठ्ठल वाघ का म्हणतात?

ध) पर्यावरणाच्या ऱ्हासाने दुःखी होणाऱ्या भावमनाचे दर्शन 'नात' या कवितेतून कसे घडते?

**किंवा**

**गट 'ड'**

प) परमेश्वराच्या सगुण-निर्गुण रुपाचे वर्णन संत ज्ञानेश्वर कसे करतात?

फ) 'हे बंध रेशमाचे ठेवी जपून जीवा' असे शांता शेळके का म्हणतात?

ब) 'अुभं अभाय फाटलं कसी झाकनार छाती।' या काव्यपंक्तीतून अभिव्यक्त होणारा आशय थोडक्यात स्पष्ट करा.

भ) 'माणसांना रक्ताचे नाते असते माहीत आहे', असे कुसुम अलाम का म्हणतात?

5. पुढील सर्व प्रश्नांची थोडक्यात व समर्पक उत्तरे लिहा. 16

1) चांगल्या वाचनापासून कोणकोणते फायदे होतात?

2) जागतिकीकरणाने साहित्याच्या संदर्भात कोणती स्वागतार्ह परिवर्तने घडवून आणली आहेत?

3) 'अष्टोत्तरशे तीर्थे जयाच्या चरणी। तो तुझा हृदयी आत्मारामु' या ओळीतील आशय स्पष्ट करा.

4) 'कोन सांगावं रगत तिले लागनार किती?' असे कवी का म्हणतो?

***************



munotes.in